# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.04.2025** **वार- शुक्रवार**

---

**फुले जयंती**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आज पुण्यातल्या फुले वाड्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. उपमुख्यमंत्री आणि  पुणे जिल्ह्याचे पालक मंत्री अजित पवार यांनी फुले वाड्यातील महात्मा फुले यांच्या स्मारकाला अभिवादन केलं. पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ.राजेन्द्र भोसले यांनी महानगरपालिकेतील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं .

**जागर संविधानाचा**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, आणि महात्मा ज्योतिबा  फुले यांच्या जयंतीनिमित्त पुण्यात 13 ते 19 एप्रिल दरम्यान जागर संविधानाचा या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या उपक्रमांतर्गत येत्या 13 तारखेला बारा वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर जन्मोत्सव सोहळा साजरा केला जाणार असून त्यामध्ये धम्मवंदना, भीमस्तुती, भीमस्मरण आणि फटाक्यांची आतिषबाजी यांचा समावेश आहे.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे प्रदेश संघटन सचिव परशुराम वाडेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**राज्य महिला आयोग**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातल्या गर्भवतीच्या मृत्यू प्रकरणी , पुणे महानगरपालिकेच्या माता मृत्यू अन्वेषण समितीचा अहवालही प्रशासनाला सादर करण्यात आल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष  रुपाली चाकणकर यांनी दिली. या प्रकरणात धर्मादाय सह आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीनं आपला चौकशी अहवाल 8 एप्रिल रोजी विधी आणि न्याय विभागाकडे सादर केला आहे. या दोन्ही चौकशी अहवालावर राज्य शासन तातडीने कारवाई करावी अशी मागणी राज्य महिला आयोगाने  केली आहे  .

**जैव विविधता उद्यान**

पुणे महापालिकेच्या विकास आराखड्यातील डोंगर माथा -डोंगर उतार आणि जैवविविधता उद्यान नियमावली तयार करण्यासाठी अभ्यासगट समितीची स्थापना करण्यात आली आहे.निवृत्त अधिकारी रमानाथ झा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून ही समिती राज्य सरकारला एका महिन्यात अहवाल सादर करणार आहे. नागरिकांच्या हरकती आणि या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सूचनांचा अभ्यास करून ही समिती अहवाल सादर करील असा विश्वास नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी व्यक्त केला.

**करार**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आता ग्लोबल कोव्हेनंट ऑफ मेयर्स फॉर क्लायमेट अँड एनर्जी  या आंतरराष्ट्रीय करारात सहभागी झाली आहे. हवामान बदलांशी लढण्यासाठी जगभरातील शहरांनी एकत्र येऊन हा करार केला असून, त्यामध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेचाही सहभाग आहे. यामध्ये 144 देशांतील 13,700 हून अधिक शहरे सहभागी आहेत. यामुळे शहराला हवामान बदलासंदर्भात तांत्रिक मदत, प्रशिक्षण, उपयुक्त माहिती तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभावी ठरलेले उपाय वापरण्याची संधी मिळणार आहे असं मत पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी व्यक्त केलं.

**303 मॉडेल शाळा**

पुणे जिल्हा परिषदेच्या 303 शाळा मॉडेल शाळा  करण्यासाठी प्रयत्न सुरू असून, इतर शाळांसाठीही सुविधा देण्यावर भर देण्यात येत आहे. यासाठी जिल्हा परिषदेच्याच काही तंत्रस्नेही आणि प्रयोगशील शिक्षकांची प्रशिक्षक म्हणून मदत घेतली जाणार आहे. या शाळांमध्ये असलेल्या कमतरता पूर्ण करण्यासाठी उपाययोजना केल्या जाणार असल्याचं पुणे  जिल्हा परिषदेचे  मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितले .

**रिक्षा टॅक्सी चालक**

रिक्षा आणि टॅक्सीचालकांनी गणवेश म्हणून पांढरा बुश शर्ट आणि खाकी पॅन्ट परिधान करणं तसंच गाडीची कागदपत्रं जवळ बाळगणं आवश्यक आहे असं उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी कळवलं आहे.

**वारस नोंदी**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बारामती प्रादेशिक कार्यालयाच्या वतीनं , इंदापूर मध्ये 15 एप्रिल रोजी तर कुरकुंभ, दौंड इथं 16 एप्रिल रोजी सकाळी 11 वाजता वारस नोंदी शिबाराचं आयोजन करण्यात आलं आहे. या शिबीरात इंदापूर आणि दौंड तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रातील कंपन्या,

भुखंडधारकांच्या समस्या सोडविण्यात येणार आहेत. संबंधितांनी याठिकाणी उपस्थित राहून वारस नोंदी करुन घ्याव्यात, असं  आवाहन प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील यांनी केलं आहे.

**आपला दवाखाना**

पुणे महापालिकेतर्फे लवकरच दहा ठिकाणी आपला दवाखाना सुरू करण्यात येणार आहे. महापालिकेच्या आरोग्य प्रमुख डॉक्टर नीना बोराडे यांनी आज आकाशवाणीशी बोलताना ही माहिती दिली. नियोजित 25 ठिकाणांपैकी पंधरा ठिकाणी  दवाखाना सुरू करण्यात  तांत्रिक अडचणी आहेत.महापालिका आयुक्त आणि आरोग्य मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची याबाबत लवकरच बैठक होणार असून तांत्रिक अडथळे दूर होतील असा विश्वास डॉक्टर बोराडे यांनी व्यक्त केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 39 तर किमान तापमान 23  पूर्णांक 8  दशांश अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्या दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहील तसंच ,तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**